# महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ

(स्वायत्त) (ISO 9001:2008) (ISO/IEC 27001:2005)

४ था मजला, शासकीय तंत्रनिकेतन इमारत, ४९, खेरवाडी, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.

दू.क्र. : २६४७१२५५/२६४७०९१६ फॅक्स : ९१-०२२-२६४७३९७९

ई-मेल : director@msbte.com संकेत स्थळ : www.msbte.com


जा.क्र. मरातंशिमं/ का-४०/बी-६/२०१४/३८१ दिनांक -०९.०९.२०१४

## परिपत्रक -

प्रति,
प्राचार्य,
मंडळाशी संलग्नित सर्व संस्था

**विषय - ऑन लाईन नोंदणी अर्जातील नाव व स्वाक्षरीसह फोटोच्या त्रुटी दुरुस्तीबाबत**

संदर्भ -

१. नाव दुरुस्ती -परिपत्रक क्र. मरातंशिमं/का-४४/बी-३३/बी-०६/२०१३/१२९ दि. १९.०३.२०१३.

२. नोंदणी अर्ज-परिपत्रक (इंग्रजी) No. MSBTE/D-40/D-21/B-6/2014/150 Date- 26.08.2014.

शैक्षणिक वर्ष २०१४-१५ मधील ऑन लाईन नोंदणी अर्ज भरण्याचे काम सुरु झाले आहे हे आपणांस विदितच आहे. सदर नोंदणी अर्ज भरताना नाव दुरुस्तीची प्रकरणे टाळण्यासाठी आणि संस्थेच्या सोयीसाठी प्रवेशाच्या वेळी तंत्र शिक्षण संचालनालयाच्या संकेतस्थळावरुन (Web-site) विद्यार्थ्याने स्वत: भरलेला आणि ए आर सी - प्राधिका-यांकडून निश्चित (Confirm) करण्यात आलेला नावासंदर्भातील सर्व डाटा उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. संदर्भ क्र. २ च्या परिपत्रकानुसार संस्थांनी तोच डाटा वापरणे बंधनकारक आहे याची प्रामुख्याने नोंद घ्यावी.

मात्र ऑन लाईन नोंदणी अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरु होताना असे निदर्शनास येत आहे की, विद्यार्थ्याचा तंत्र शिक्षण संचालनालयाच्या संकेतस्थळावर त्याने भरलेला आणि सदर प्राधिका-यांकडून कन्फर्म करण्यात आलेला प्रामुख्याने नावा संदर्भातील डाटा विद्यार्थ्याच्या शालांत परीक्षेच्या (दहावी - एस. एस. सी.) गुणपत्रिकेवरील नावाशी तंतोतंत जुळत नाही. नोंदणी करताना विद्यार्थ्याचे नाव त्यांच्या शालांत परीक्षेच्या मुळ गुणपत्रिकेप्रमाणेच असणे मंडळाच्या परीक्षाविषयक नियमावलीतील नियम आर जी १३ प्रमाणे आवश्यक आहे याची संस्थेतील सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

ज्या प्रकरणांमध्ये विद्यार्थ्यांच्या तंत्र शिक्षण संचालनालयाकडे सादर केलेला नावाबाबतचा डाटा त्याच्या दहावीच्या गुणपत्रिकेवरील नावाशी तंतोतंत जुळत नाही अशा प्रकरणांमध्ये संस्थेने योग्य त्या पुराव्याची खातरजमा करुन अचूक नाव दुरुस्ती आपल्या स्तरावरच करावयाची आहे. मात्र अशी दुरुस्ती करताच

संगणकीय प्रणालीव्दारा अशा विद्यार्थ्यांचे नाव स्वतंत्र यादीमध्ये आपोआप समाविष्ट होईल. अशा प्रकरणांची स्वतंत्र यादी विहित पुराव्यासह प्राचार्यांनी व्यक्तिशः पडताळून विद्यार्थ्यांकडून तसे पत्र घेऊन ही सर्व प्रकरणे संबंधित विभागीय कार्यालयाकडे निश्चितीसाठी सादर करताना ( for Confirmation at R.B.T.E.) अचूक नाव ऑन लाईन नोंदणी अर्जामध्ये नोंदविल्याची खातरतमा संस्थेने करावयाची आहे. विभागीय कार्यालयांनी या नावांच्या संस्थास्तरावर करण्यात आलेल्या दुरुस्त्यांची विहित पुराव्यासह अचूक छाननी करुन सदर दुरुस्त्या कन्फर्म करावयाच्या आहेत. जोपर्यंत विभागीय कार्यालयांकडून अशा दुरुस्तीच्या प्रकरणांची निश्चिती (Confirmation) होत नाही तोपर्यंत या प्रकरणांतील कोणत्याही विद्यार्थ्यास नोंदणी क्रमांक ऑन लाईन पध्दतीने प्राप्त होणार नाही. तसेच ज्या प्रकरणी विद्यार्थ्यांच्या दहावीच्या गुणपत्रिकांमध्येच नाव दुरुस्ती असल्याचे विद्यार्थ्यांकडून कळविण्यात आले असेल ती प्रकरणेदेखील याच पध्दतीने निर्णयांकित होणे आवश्यक आहे. अशा प्रकारची नाव दुरुस्तीची प्रकरणे नियमित नोंदणी अर्जांच्या प्रक्रियेसोबतच पूर्ण होण्याबाबत संस्थांनी विशेष काळजी घ्यावयाची असून एकूणच नावदुरुस्ती प्रकरणे उद्भवू नयेत याकरीता नावांतील या प्रकारच्या चुकांबाबत संस्थांनी सर्वथैव दक्षता घेणे आवश्यक आहे. वरील दुरुस्त्यांव्यतिरीक्त विद्यार्थ्यांच्या नावांमध्ये अथवा स्वाक्षरीसहच्या फोटोमध्ये कोणत्याही प्रकारच्या त्रुटी नसल्याचे प्राचार्यांच्या स्वाक्षरीचे पत्र विभागीय कार्यालयाकडे सादर करणे आवश्यक असून ज्या संस्थांमध्ये NIL दुरुस्त्या आहेत अशा संस्थांच्या प्राचार्यांनीही तसे पत्र देणे आवश्यक आहे.

त्याचप्रमाणे असेही निदर्शनास येत आहे की, संदर्भ क्र. २ मध्ये सुचित केल्याप्रमाणे विद्यार्थ्यांच्या छायाचित्राखाली विहित जागेमध्ये विद्यार्थ्यांची स्वाक्षरी घेतलेली नाही. स्वाक्षरीविना स्वीकृत करण्यात आलेल्या (Upload) छायांकित प्रतिमा ग्राह्य मानण्यात येणार नाहीत व या त्रुटीमुळे उद्भवणा-या फोटो करेक्शन्स प्रकारच्या दुरस्त्यांबाबत संस्थेस पूर्णतया जबाबदार धरण्यात येईल व उचित दंडात्मक कार्यवाहीनंतरच अशी प्रकरणे निर्णयांकित करण्यात येतील.

एकूणच, संस्थानी नाव तथा फोटोसह स्वाक्षरीच्या संभाव्य सर्व त्रुटींबाबत गांभीर्याने पाहणे आवश्यक असून ऑन लाईन प्रणालींतर्गत या प्रकारच्या प्रकरणांमध्ये ZERO ERROR हेच उद्दीष्ट संस्थांनी बाळगणे मंडळास अपेक्षित आहे.

(डॉ. विनोद म. मोहितकर)
सचिव
म. रा. तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई

प्रत-

१. संचालक, म.रा. तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई - यांना माहितीसाठी सादर.

२. उपसचिव, म.रा.तं.शि.मंडळ वि.का. पुणे/औरंगाबाद/नागपूर तथा प्रभारी अधिकारी, मुंबई उपविभाग - यांना आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

३. पोर्टल मॅनेजर, म.रा.तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई - मंडळाच्या संकेतस्थळावर सदर परिपत्रक प्रसिध्द करण्यासाठी.